# महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ

(महाराष्ट्र शासनाचा अंगिकृत व्यवसाय)

"उद्योग सारथी", मरोळ औद्योगिक क्षेत्र, महाकाली गुंफा मार्ग, अंधेरी (पूर्व), मुंबई-९३

क्र.मऔविम/भूविभाग/म.व्य.(भूमी)/A15145 दिनांक : 11/01/2019

## परिपत्रक

**विषय : "ड" आणि "ड+" विभागात औद्योगिक समूहाला प्राधान्याने भूखंड वाटप करणेबाबबत..**

**संदर्भ :-मऔविम/भूविभाग/कार्यासन-१/३३२२/२०१२ दिनांक १९.१२.२०१२**

महामंडळाच्या औद्योगिक क्षेत्रांतील अविकसित क्षेत्रातील छोटया समूहांचा समूह विकास होण्याच्या दृष्टीकोनातून अशा भौगोलिकदृष्टया विशिष्ठ ठिकाणी केंद्रिभूत झालेले एकाच किंवा तत्सम प्रकारचे उत्पादन करणारे/सेवा देणारे उद्योग ज्यांची उत्पादन प्रक्रिया, लाभाच्या संधी, व्यवसायातील त्रुटी, कमतरता, धोके यामध्ये समानता आहे, अशा महामंडळाच्या "ड" आणि "ड+" विभागातील औद्योगिक समूहाला प्रोत्साहन देण्याच्या उद्देशाने तसेच त्यांचा उत्पादनाचा दर्जा वाढवून त्यांना अधिक स्पर्धात्मक बनविण्यासाठी अशा उद्योजकांना भूखंड वाटपामध्ये प्राधान्य देऊन अशा भूखंडाच्या विकासाकरीता जे धोरण प्राधान्य सदराखाली वाटप केलेल्या भूखंडांना लागू आहे तेच धोरण या भूखंडांना लागू करणे आवश्यक असल्याने याबाबतचा विषय संचालक मंडळाच्या दिनांक ३१.१०.२०१८ रोजी झालेल्या ३७६ व्या बैठकीत चर्चीत होवून ठराव क्र. ५७९६ पारीत करण्यात आला. सदरहू ठरावाच्या अनुषंगाने, "ड" आणि "ड+" विभागातील औद्योगिक क्षेत्रांतील औद्योगिक समूहास खालील अटी व शर्तीवर प्राधान्याने भूखंड वाटप करण्यात यावे.

१) महामंडळाच्या "ड" आणि "ड+" विभागातील औद्योगिक क्षेत्रांतील औद्योगिक समूह म्हणजे भौगोलिकदृष्टया विशिष्ठ ठिकाणी केंद्रिभूत झालेले एकाच किंवा तत्सम प्रकारचे उत्पादन करणारे/सेवा देणारे उद्योग ज्यांची उत्पादन प्रक्रिया, लाभाच्या संधी, व्यवसायातील त्रुटी, कमतरता, धोके यामध्ये समानता आहे अशा औद्योगिक उपक्रमांचा समूहास प्राधान्याने भूखंडाचे वाटप करणे.

२) औद्योगिक समूहाकरीता किमान २० ते २५ उद्योजकांची आवश्यकता असून त्यापैकी किमान ६० टक्के उद्योजकांचे उद्योग चालू असणे आवश्यक आहे. उर्वरित ४० टक्के उद्योजक, हे नवीन उद्योजक असतील.

३) या औद्योगिक समूहाची एकूण प्रकल्पामधील गुंतवणूक किमान ५० कोटी असणे आवश्यक आहे. शासनाची मंजूरी असलेले औद्योगिक समूह(Govt. approved cluster) यांना गुंतवणूकीची मर्यादा राहणार नाही.

४ ) औद्योगिक समूहात अंतर्भूत किमान ६० टक्के उद्योजकांचा उद्योग मागील किमान तीन वर्षे चालू असणे आवश्यक आहे. त्यासाठी त्यांनी खालीलप्रमाणे पुरावे सादर करणे आवश्यक आहे.

१) यंत्र सामुग्री खरेदी २) उत्पादन करण्यासाठी कामगारांची नियुक्ती ३ ) विद्युत पुरवठयाची देयके ४) कच्चा माल खरेदीची देयके ५) उद्योग आधार ६) प्रदुषण नियंत्रण मंडळाचे प्रमाणपत्र (Consent to Operate) ७) पक्का माल विक्रीची देयके ८ ) सेवाकर नोंदणी प्रमाणपत्र(Service Tax Registration) ९) एक्साईज गेट पास व रजिस्ट्रेशन १०) विक्रीकर परतावे ११) वार्षिक ताळेबंद पत्रक.. सदर पुराव्यांची तपासणी तांत्रिक सल्लागार मार्फत करण्यात येईल.

५) औद्योगिक समूहास भूखंडाचा ताबा दिल्यापासून ३ वर्षामध्ये भूखंडाचा विकास करुन उत्पादनात जाणे बंधनकारक राहणार आहे. विहित कालावधीमध्ये भूखंडाचा विकास केला नाही तर मुदतवाढ मंजूर न करता भूखंड महामंडळास परत करावा लागेल/ महामंडळ सदर भूखंड परत घेईल.

६) ५ वर्षापर्यन्त भूखंडाचे हस्तांतर अनुज्ञेय होणार नाही. ५ वर्षाच्या आत भूखंडाचे हस्तांतर करावयाचे झाल्यास मु.का.अ. यांची मंजूरी घेण्यात यावी.

७) ज्या प्रयोजनासाठी भूखंड वाटप करण्यात आलेला आहे त्या प्रयोजनासाठीच महामंडळाच्या प्रचलित धोरणानुसार भूखंड हस्तांतर करता येईल.

८) उद्योग समूहासाठी वाटप केलेल्या भूखंडावर पोटभाडयास परवानगी देण्यात येणार नाही.

९) उद्योजकांच्या प्रकल्पामधील गुंतवणूकीबाबत तांत्रिक सल्लागार यांचे अभिप्राय घेवून त्यानुसार क्षेत्र वाटपाबाबत निर्णय घेण्यात यावा.

१०) औद्योगिक समूहाला भूखंड वाटप करण्याचे अधिकार सह मु.का.अ. यांचे अध्यक्षतेखालील भूखंड वाटप समितीस राहतील.

११) अशा प्रकरणांसाठी मु.का.अ. यांची पूर्व मान्यता घेण्यात यावी.

"ड" आणि "ड+" विभागातील औद्योगिक क्षेत्रांतील औद्योगिक समूहास भूखंड वाटपाचे वरीलप्रमाणे धोरण या परिपत्रकाचे दिनांकापासून लागू राहिल. सर्व संबंधितांनी सदर सुधारित धोरणाची नोंद घेऊन त्यानुसार कार्यवाही करण्यात यावी.

सदरहू परिपत्रक मा. मुख्य कार्यकारी अधिकारी यांचे मान्यतेने निर्गमित करण्यात येत आहे.

**(अण्णासाहेब मिसाळ)**
**सह मुख्य कार्यकारी अधिकारी(प्रशासन)**
**मऔविम, मुंबई.**

प्रति,

१. सर्व विभाग प्रमुख, मऔविम, मुंबई.

२. अतिरिक्त मुख्य अभियंता, मऔविम, पुणे/नांदेड/नागपूर.

३. सर्व अधिक्षक अभियंता, मऔविम.
४. सर्व प्रादेशिक अधिकारी, मऔविम.
५. सर्व कार्यकारी अभियंता, मऔविम.
६. सह मुख्य/उप मुख्य लेखा अधिकारी, मऔविम, मुंबई/पुणे /औरंगाबाद/नागपूर.
७. महाव्यवस्थापक (भूमि)/महाव्यवस्थापक (भूसंपादन)/व्यवस्थापक (भूमि-१/२), मऔविम, मुंबई.
८. प्रशासकीय अधिकारी, मऔविम, मुंबई.
९. व्यवस्थापक (भूसंपादन-१/२), मऔविम, मुंबई.
१०. जनसंपर्क अधिकारी, मऔविम, मुंबई.
११. सर्व क्षेत्र व्यवस्थापक, मऔविम.
१२. म.औ.वि. महामंडळाचे सर्व संचालक.
१३. सर्व महाव्यवस्थापक, जिल्हा उद्योग केंद्र.
१४. सर्व औद्योगिक संघटना.
१५. मुख्य मध्यवर्ती परिपत्रक नस्ती/मुख्य कार्यकारी अधिकारी, मऔविम, कार्यालय मरोळ/जागतिक व्यापार केंद्र (डब्ल्यू.टी.सी.), कफ परेड, मुंबई